www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 132 वा शुक्रवार दि. 24 जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## कळंबोली येथे श्री संत वामनभाऊ महाराजांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी




**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
कळंबोली येथे श्री संत वामनभाऊ महाराज व श्री संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर सेक्टर 4 येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते . या सप्ताहाची बुधवार दिनांक २२/१/२४ रोजी सकाळी ह भ प रामकृष्ण महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन झाले कीर्तन ऐकण्यासाठी सेक्टर चार मधील व कळंबोली मधील असंख्य महिला पुरुष मंडळी उपस्थित होते . किर्तन चालू असताना पनवेलचे कार्यसम्राट आमदार माननीय प्रशांत दादा ठाकूर हे उपस्थित झाले असता महंत रामकृष्ण महाराज शास्त्री यांनी त्यांचे कोड कौतुक केले व त्यांच्या कार्याची महती विशद केली व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या . यावेळी शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे भाजपाचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील प्रभाग आठचे माजी नगरसेवक बबन मुकादम सौ प्रिया मुकादम सौ बायजा बारगजे शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक विक्रीकर उपायुक्त शरद हेकरे साहेब व अनेक पदाधिकारी **पान २ वर**

# राज्यात लवकरच ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक उभारणार

## परीक्षांना आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार

मुंबई : राज्य परिवहन विभागाने (आरटीओ) ड्रायव्हिंग लायसन्स प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि गुणवत्ता आणण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात लवकरच ३८ ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक उभारण्यात येणार आहेत. या ट्रॅकच्या माध्यमातून पक्क्या ड्रायव्हिंग लायसन्ससाठी होणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षांना आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार मिळणार आहे, असे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी सांगितले. सध्या पुण्याच्या भोसरीमध्ये पहिला ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक कार्यान्वित आहे. देशातील इतर राज्यांमध्ये असे ट्रॅक यशस्वी ठरत आहेत. या ट्रॅकवर घेण्यात येणाऱ्या चाचण्यांमध्ये वाहनचालकांच्या कौशल्याची अचूक मोजणी होते. आयुक्त भिमनवार यांनी सांगितले की, आधुनिक चाचणी पद्धतीमुळे चांगले ड्रायव्हर घडवले जातील. यामुळे रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होऊन सुरक्षित वाहतुकीला चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. ऑटोमॅटिक ट्रॅकच्या माध्यमातून होणाऱ्या चाचण्यांमध्ये फेल होण्याचे रमाण ३०-३५ टक्के आहे

### अशी घेण्यात येणार चालकांची चाचणी

**ऑटोमॅटिक ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅकवर चाचणी घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. प्रत्येक ट्रॅकवर कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कॅमेरे बसविले जातील. हे कॅमेरे वाहनचालकाच्या चाचणी प्रक्रियेवर सतत लक्ष ठेवतील. कॅमेऱ्याच्या माध्यमातून ड्रायव्हिंग चाचणीदरम्यान वळणे, साइड पार्किंग, रिव्हर्स स्पीड आदी पैलूंची नोंद केली जाईल. सिस्टीम वाहनचालकाच्या चुका ओळखून त्यांचे मूल्यांकन करेल. मानवी हस्तक्षेप कमी असल्याने प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह बनेल, असे आयुक्त म्हणाले.**
सध्या लर्निंग लायसन्ससाठी ऑनलाइन परीक्षा घेतली जाते. त्यामध्ये पास झाल्यावर त्या उमेदवाराला एका महिन्यानंतर आरटीओ कार्यालयात जाऊन प्रात्यक्षिक परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा मॅन्युअल पद्धतीने घेतली जाते. परीक्षेमध्ये गाडी चालविताना उमेदवाराचे मूल्यांकन पर्यवेक्षकाकडून करण्यात येते. त्यानंतर उमेदवाराला पक्के लायसन्स देण्यात येते.

### अशी घेतली जाते टेस्ट

**सऑनलाइन परीक्षा घेतली जाते. त्यामध्ये पास झाल्यावर त्या उमेदवाराला एका महिन्यानंतर आरटीओ कार्यालयात जाऊन प्रात्यक्षिक परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा मॅन्युअल पद्धतीने घेतली जाते. परीक्षेमध्ये गाडी चालविताना उमेदवाराचे मूल्यांकन पर्यवेक्षकाकडून करण्यात येते. त्यानंतर उमेदवाराला पक्के लायसन्स देण्यात येते.**

## प्रमोद सूर्यवंशी हे साहित्य रत्न पुरस्काराचे मानकरी

**दैनिक युवक आधार मुंबई, वार्ताहर**
प्रसिद्ध साहित्यिक आणि "आम्ही मुंबईकर" या साप्ताहिकाचे संपादक श्री. प्रमोद सूर्यवंशी यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल कोकण ग्राम विकास मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. स्वर्गीय यमुनाबाई बाजी राणे स्मृती पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित २६व्या मालवणी महोत्सवात हा सन्मान करण्यात आला. प्रमोद सूर्यवंशी हे एक नावीन्यपूर्ण विचारांचे साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी केवळ संपादकीय लेखनच नाही, तर समाजाला प्रगल्भ संदेश देणारे अनेक लघुपटही साकारले आहेत. त्यांच्या लघुचित्रपटांनी समाजातील समस्यांना प्रकाशझोताखाली आणत कलात्मकतेचे आणि सामाजिक जाणिवेचे उत्तम उदाहरण दिले आहे. त्यांना सन्मान प्रदान करताना , "प्रमोद सूर्यवंशी हे केवळ साहित्यिक नाहीत, तर समाजासाठी योगदान देणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी केलेले लेखन आणि निर्मिती हे समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी महत्त्वाचे ठरणारे आहे." असे गौरवोद्गार उपस्थित प्रमुख अतिथींनी काढले. प्रमोद सूर्यवंशी यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या महोत्सवात मान्यवर साहित्यिक, कलाकार, आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना त्यांच्या लेखन आणि निर्मितीने साहित्य क्षेत्राला नवे वळण मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या साप्ताहिकाच्या संपादनाबरोबरच, सामाजिक जाणीवा अधोरेखित करणाऱ्या त्यांच्या लघुपटांना स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावरही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. साहित्य, कला आणि समाजसेवा या तीनही क्षेत्रात त्यांनी आजवर बजावलेली भूमिका ही अनुकरणीय आहे. प्रमोद सूर्यवंशी यांचे हे कौतुक मुंबईकरांसाठी निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.

## हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त म्हणता येते रक्तदान शिबिराचे आयोजन.

**दैनिक युवक आधार दै निक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** दि. २३ रोजी मंठा येथे हिंदुर्ह्यद्यसम्राट शिवसेनाप्रमुख मा श्री बाळासाहेब ठाकरे व आजाद हिंद सेनेचे संस्थापक मा सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमीत्य विनम्र अभिवादन करण्यात आले व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे त्यावेळी मा.श्री.ए.जे.पाटील बोराडे शिवसेना जिल्हाप्रमुख जालना सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा संतोषराव वरकड,लक्ष्मण टोप्पे,डिगांबर बोराडे युवासेना तालुका प्रमुख मंठा संस्थापक अध्यक्ष धर्मवीर शंभु राजे बहुउद्देशींय सेवाभावी संस्था मंठा,कुलदीप बोराडे,वझीर पठाण युवासेना तालुका सचिव मंठा, नानासाहेब बोराडे उप शहर प्रमुख मंठा,गोपी गायकवाड युवासेना शहर प्रमुख मंठा, बाबा राठोड, पप्पु दायमा, बबनराव शेळके, भागवत चव्हाण युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, विकास घनवट युवासेना उप शहर प्रमुख मंठा,दत्ता काळे युवासेना मिडिया प्रमुख मंठा,एका बोराडे,विष्णु बहाड युवासेना उप तालुका प्रमुख मंठा,मनु गिरी युवासेना उप तालुका प्रमुख मंठा, संतोष शेंडगे युवासेना विभाग प्रमुख हेलस,संदिप राठोड,रमण टोप्पे,व युवासेना मंठा तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते आदिंची उपस्थिती होती लोकमान्य ब्लड बँक संभाजीनगर



## कळंबोली येथे श्री संत वामनभाऊ महाराजांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी

**पान १ वरुन** उपस्थित होते मंडळाचे अध्यक्ष श्री विजय गर्जे मार्गदर्शक व भाजपा भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे श्री आजिनाथ जायभाये , देविदास खेडकर , दिनकर बडे , श्रीकृष्ण गर्जे , विष्णु कंठाळे अंबादास गर्जे , विलास गर्जे यांनी यांनी मेहनत घेतली स्वामी समर्थ मंदिराचे विश्वस्त श्री संदीप मते काका यांनीही मोलाचे सहकार्य केले . यांच्याबरोबरच मंडळाचे तरुण कार्यकर्ते अंकुश बडे महेश बारगजे कृष्णा कंठाळे विजय जायभाय सचिन जायभाय अक्षय गर्जे शनी गर्जे दत्ता बिनवडे विकास सानप इत्यादी तरुण कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडला .

## बार्टी मार्फत ऑनलाईन आर टी ई चे फॉर्म मोफत भरणे सुरू



**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

वसमत:महाराष्ट्र शासन प्राथमिक शिक्षण संचालनालय मार्फत आर.टि.ई 2025 दुर्बल वंचित घटकांसाठी स्वयं अर्थ, विनाअनुदानित शाळा ,खाजगी शाळा मध्ये 25% प्रवेश प्रक्रियाबाबतत दिनांक 14 जानेवारीपासून आर.टि.ई. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे . त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी )मार्फत मा.महासंचालक सुनिलजी वारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य भर समतादूता मार्फत मोफत आनलाईन अर्ज भरण्यासाठी सुरुवात झालेली आहे समतादुत प्रकल्प हिंगोली जिल्हा प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे जिल्हातील वसमत तालुका मध्ये समतादूत गाडेकर गुरूनाथ व मिलींद आळणे हे वसमत शहारातील व जवळील ग्रामिण भागात आनलाईन अर्ज भरूण देत आहेत तरी या आर.टि.ई 25% मोफत शिक्षण अधिकार Rte ऑनलाईन फॉर्म 14 जानेवारी ते 27 जानेवारी 2025 पर्यंत भरून घ्यावे.

## .. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने बाळासाहेबांची जयंती साजरी करण्यात आले..

**दैनिक युवक आधार -**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

नळदुर्ग येथील कै.बाळासाहेब ठाकरे चौकात निष्ठावंत नळदुर्ग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने हिंदुरुदय सम्राट शिवसेना प्रमुख माननीय कै बाळासाहेब ठाकरे यांची ९९ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण यांनी बाळासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करून आपल्या मनोगता तून नळदुर्ग शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पाठीशी राहणार असल्याचे यावेळेस बाळासाहेबांची शपथ घेऊन आपले विचार व्यक्त केले यावेळी उपतालुकाप्रमुख सरदार सिंग ठाकूर नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले उपशहरप्रमुख शाम कनकधर सोमनाथ म्हेत्रे युवा सेना शहर प्रमुख नेताजी महाबोले सुर्यकांत घोडके भिम कोळी चिकुंद्रा चे शाखा प्रमुख संतोष मोटे प्रा.बालाजी गायकवाड पत्रकार सोमनाथ बनसोडे खंडू माने ओंकार कलशेट्टी ज्ञानेश्वर कदम मालू व्होनाळे चंद्र सगरे या सर्वांनी अभिवादन करून त्रिवार मुजरा करण्यात आला



# 1984 च्या गौरवशाली आणि शौर्यशाली आंदोलनाला 41 वर्षे होऊनही प्रकल्पग्रस्त उपेक्षित ?

## तीच टिमकी तीच हलगी, आंदोलनाचे लेजिम खेळून प्रकल्पग्रस्थ थकले

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतींनिधी/प्रदीप पाटील**



दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली 1984 चा गौरवशाली आणि शौर्यशाली लढा संपन्न झाला होता. या लढ्यात 5 जणांना हौतात्म्य पत्करावे लागले होते. विशेष म्हणजे या लढ्यामुळे देशभरातील प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याची सुरूवात झाली आणि आजही मिळत आहे. मात्र ज्या भूमीवर हा गौरवशाली आणि शौर्यशाली लढा उभारला होता, ते उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तया लढ्याचा 41 वा हुतात्मा दिन साजरा करत असतानाही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत हेत्यांचे दुर्दैव म्हणावे लागेल. कोकणचे भाग्यविधाते म्हणून समजले जाणारे दिवंगत तत्कालीन माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांनी रायगडचा विकास करीत अनेक प्रकल्प उरणात आणून स्थानिकांची नोकरभरती केली होती. त्यानंतर असे नेतृत्व आज लाभले नाही. आज मात्र दरवर्षी 16 व 17 जानेवारी या दोन दिवशी हुतातमादिनी व्यासपीठावर अनेक नेतेमंडळी मोठ मोठ्याने आपल्या भाषणाची तीच टिमकी तीच हलगी,वाजवित असल्याने आंदोलनाचे लेजिम खेळून-खेळून प्रकल्पग्रस्थ थकले, 41 वर्षे होऊन ही गौरवशाली लढ्यातील उरणमधील प्रकल्पग्रस्त न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे भयानक आणि विदारक दृश्य आजही पहावयास मिळत आहे. गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विमानतळाचे नामकरण लोकनेते दि. बा. पाटील असे करता आलेले नाही, की गावागावच्या रेल्वे स्थानकांच्या नामंतरचा प्रश्नही सुटला नाही 100 खाटांच्या रुग्णालयाचा प्रश्न गेली अनेक वर्ष सिडकोकडून लाखो रुपये .देऊन रुग्णाल्यासाठी विकत घेतलेल्या भूखंडावर घेतलेल्या वाढलेल्या रानटी झुडुपत-गवतात दडून आहे मात्र या दोन दिवसात न विसरता नेते मंडळी आपली हलगी,पिपाणी.पापेरी घेऊन वाजवायला येण्याचे ते कधीही विसरत नाही हे प्रकल्पग्रस्तांचे दुर्दैव आहे. या भागातील सर्वसामान्य जनतेचे लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली येथील शेतकऱ्यांच्या शेतीला योग्य भाव मिळावा म्हणून शासना विरोधात सर्वपक्षीय आंदोलन 16 जानेवारी 2984 साली दास्तानफाटा येथे झाला. या आंदोलनात गोळीबार होऊन नामदेव शंकर घरत, रघुनाथ अर्जुन ठाकूर यांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यानंतर दि. 17 जानेवारी 1984 साली नवघरफाटा येथे आंदोलन झाले त्यामध्ये महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील हे बापलेक तर कमळाकर कृष्णा तांडेल असे तिघे जणांना हौतात्म्य पत्करावे लागले होते. त्यानंतर दरवर्षी 16 व 17 जानेवारी या दोन दिवशी जासई व पागोटे येथे हुतात्मा दिन साजरा केला जात आहे. नुकताच 41 वा हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. परंतु हा दिन साजरा करताना शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन साजरा करावा लागतो या प्रतीवर्षी नेते मंडळी आपलीतीच हलगी,पिपाणी.पापेरी वाजवित येत असल्याने प्रकल्पग्रस्तांची उपस्थिती कमी होतानाचे चित्र पहावयास मिळत आहे. यावरून प्रकल्पग्रस्तांनाही हुतात्मा दिनाचे महत्व राहिलेले नसल्याचे दिसते. कारण प्रत्यक्षात आज 41 वर्षे होऊनही प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्रलंबित असल्यानेच तीचतीच आश्वासनाची टिमकी हलगीआणि पापेरी ऐकण्यापेक्षा कार्यक्रमास न आलेले बरे अशी चर्चा प्रकल्पग्रस्तांमध्ये सुरू आहे.

## असा चित्रीत झाला 'मिशन अयोध्या'तील जीवघेणा स्टंट !

### मिशन अयोध्या'मध्ये आगीच्या भक्षस्थानी कलाकाराने चित्रित केला थरारक सिन!

**दैनिक युवक आधार -**




निर्माते कृष्णा दादाराव शिंदे आणि योगिता कृष्णा शिंदे यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' या चित्रपटातील साहसदृश्याची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. हे साहस दृश्य जीवावर उदार होऊन चित्रपटात 'कारसेवक विचारे' ही प्रमुख भूमिका करणारे कलावंत डॉ. अभय कामत यांच्यावर चित्रित झाले आहे. चित्रपटातील एका दृश्यात प्रभू श्रीरामांचा झेंडा जाळण्याचा प्रयत्न चित्रपटातील खलनायक करीत असतो. त्याच्या हातातून हा झेंडा खेचून कारसेवक विचारेंना तो वाचवायचा आहे. या झटापटीत चिडलेला खलनायक त्यांना पेटवून देतो. हे थरारक दृश्य कोणताही डमी कलाकार न घेता चित्रित करायचे होते. दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे आणि प्रख्यात फाईट मास्तर मोझेस फर्नांडिस यांनी डॉ. अभय कामत यांना यातील धोका आणि खबरदारी याबद्दल कल्पना देत दृश्य समजावले. डॉ. अभय कामत यांनीही जीवावर बेतणारे हे दृश्य डमी न घेता चित्रित करण्याचे चॅलेंजिंग स्वीकारले. जराही जीवाची पर्वा न करता या व्यक्तिरेखेच्या 'करो या मरो' स्वभावानुसार त्यांनी हे दृश्य एका टेकमध्ये ओके केले. ते पाहून ऍक्शन डिरेक्टर मोझेस फर्नांडिस खूपच भावुक झाले. त्यांनी डॉक्टरांचे मनापासून कौतुक केले. ते म्हणाले आजपर्यंत त्यांनी हजारे चित्रपट त्यातील ऍक्शन सिन शूट केले आहेत पण डमी न घेता असा सिन यापूर्वी कोणत्याही कलावंताने केला नाही. ही रिस्क फक्त डॉ. अभय कामत सारखे तडफदार मराठी कलावंतच घेऊ शकतात, अशी भावुक प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## ग्रेड चित्रकला परीक्षेत सरस्वती विद्यालय तेलगाव चे घवघवीत यश

दैनिक युवक आधार




पाटोदा (प्रतिनिधी) – धारूर तालुक्यातील तेलगाव येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इंटरमिजिएट व एलिमेंट्री परीक्षा-२०२४ परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून या मध्ये सरस्वती विद्यालय तेलगाव तालुका धारूर जिल्हा बीड या विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा इंटरमिजिएट आणि एलेमेंटरी परीक्षेचा निकाल १००% लागला आहे. शाळेमधून इंटरमिजिएट परीक्षेसाठी १९ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. इंटरमिजिएट परीक्षेमधून A – ग्रेड मध्ये १५ विद्यार्थी B – ग्रेड मध्ये ३ विद्यार्थी C – ग्रेड मध्ये १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर एलिमेंटरी परीक्षेसाठी २८ विद्यार्थी बसलेले होते एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत A – ग्रेड मध्ये १५ विद्यार्थी, B – ग्रेड मध्ये ७ विद्यार्थी, C – ग्रेड मध्ये ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या दोन्ही परीक्षेत एकूण A ग्रेड मध्ये ३० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर, डॉ.देशमाने सर, डॉ. गुट्टे सर शालेय समितीचे अध्यक्ष अशोकरावजी लगड, प्राचार्य श्री.शिंदे व्ही. आर.सर, साप्ताहिक जनसामान्याचा विकासनामा वृत्तपत्राचे संपादक बालासाहेब फपाळ, पर्यवेक्षक चवार सर व कलाशिक्षक मोराळे सर व सर्व शिक्षक वर्ग व कर्मचारी वृंदांकडून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन करण्यात आले.

## वरुड तालुकास्तरीय स्वयंसेवक कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न.

**युवक आधार प्रतिनिधी**
**रणिता ठाकूर रायगड**
**अमरावती जिल्ह्यातील**

वरुड तालुक्यामध्ये तब्बल 130 स्वयंसेवकांसाठी 20 जानेवारी 2025 रोजी जानकीदेवी विद्यालय वरुड येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.सदर कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.मा.गट शिक्षणधिकरी साहेब गाडे सर, विस्तार अधिकारी बुरांगे सर, साधन व्यक्ती लुंगे सर,प्रथम राज्य प्रमुख सोमराज सर यांनी सर्व स्वयंसेवकांना मागदर्शन केले. सदर कार्यक्रमातील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली, त्यामध्ये, प्रथम संस्थेची माहिती, प्रथम संस्था गावांमध्ये



राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. गावामध्ये दिसणाऱ्या बदलांवर चर्चा झाली. गावातील स्वयंसेवकांचे अनुभव ऐकण्यात आले. भाषा व गणित प्रशिक्षणात प्रमोद घंगारे सरांनी स्वयंसेवकांना गणिताच्या विविध स्तरांनुसार मुलांना शिकवण्याचे महत्त्व सांगितले.गणितामधील विविध क्रियाकृतींची माहिती दिली व स्वयंसेवकांना त्याचा सराव करून घेतला.निलेश सहस्त्रबुद्धे सरांनी स्तर निश्चित संदर्भात असर चाचणी विषयी मार्गदर्शन केले. भाषा विषयाचे प्रशिक्षणात मुलांची शैक्षणिक प्रगती कशी सुनिश्चित करता येईल, यावर सविस्तर चर्चा झाली.स्वयंसेवकांना क्रियाकृतीमध्ये सहभागी करून घेतले.विनोद ठाकरे सर यांनी सर्व स्वयंसेवकांना शिक्षणाच्या बदली शिक्षा या कोर्स संदर्भात सविस्तर माहिती माहिती दिली.या कार्यक्रमाला आलेल्या मान्यवरांमध्ये पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाडे सर, केंद्रप्रमुख धनांचे टिकर, चंदन आडे, बुरंगे सर, बीआरसी साधन व्यक्ती मंगेश लुंगे सर, आणि जानकीदेवी विद्यालयाचे मुख्याध्यापक डबरासे सर,सोमराज गिरटकर (प्रथम संस्थेचे राज्य प्रमुख)प्रफुल सर (विभाग प्रमुख प्रथम संस्था) आणि वरुड प्रथम टीम,प्रथमचे प्रतिनिधी प्रमोद घंगारे, राणी गिरडकर, नीलेश सहस्त्रबुद्धे, प्रमोद मुगल,विनोद ठाकरे, मनीष ठाकरे आणि वरुड तालुक्यातील 97 गावातील एकूण 130 स्वयंसेवक उपस्थित होते. जाता जाता सर्व स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रमाबद्दल मान्यवरांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. आणि कृतीयुक्त सहभागातून सदर स्वयंसेवक कार्यशाळा संपन्न झाली.

## आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन जल्लोषात साजरा

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**






सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या विशेष करून महिलांचे प्रश्न सोडवुन त्यांना समुपदेशन करणा-या पुण्याच्या आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन नुकताच जल्लोषात साजरा झाला.सदर कार्यक्रमाची संपुर्ण थीम"महिलांचे मानसिक स्वास्थ्य"ही होती.सदर कार्यक्रमास अतिथी/ प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.राणी खेडीकर मॅडम(बालकल्याण समिती अध्यक्षा) उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरूवात मेहना झुझम यांनी सावित्रीबाईंच्या मनोगताने केली.यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ.राणी खेडीकर मॅडम यांचा यथोचित सत्कार आमोदिनींनी शाल आणि साडी नेसवून केला.प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना देहविक्री करणा-या स्त्रिया आणि त्यांची मुले यांची सत्यपरिस्थिती,त्यांना येणा-या अडचणी त्यासाठी राणी ताई करत असलेले कार्य,अशा मुलांकडे आपण समाजाने बघायचा दृष्टीकोन बदलणे कसे आवश्यक आहे,त्याची गरज आणि अशा स्त्रियांना ख-या अर्थाने सक्षम करून त्यांचे मनस्वास्थ टिकविण्यासाठी काय करता येईल याविषयीची माहिती दिली. राणी ताईंनी दिलेल्या भावनिक सादेमुळे सर्व आमोदिनींना अगदी हेलावून टाकले होते.सदर कार्यक्रमास एमआयटी लॉ कॉलेजच्या डीन डॉ.सपना देव मॅडम उपस्थित होत्या.तसेच जेष्ठ वकील माधवी पोतदार मॅडम,एडवोकेट सुनिता बंसल मॅडम इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्येच कष्टकरी मावशी यांचा सन्मान त्यांना दैनंदिन जीवनात लागणा-या वस्तू म्हणजेच स्टील डबा आणि पिशवी देऊन आनंदाने करण्यात आला. तसेच मेहना या आमोदिनीने कष्टकरी मावशींना ओवाळले.तसेच सर्वांना हळदीकुंकू देऊन वाण देण्यात आले. सदरचे वाण व गिफ्ट आमोदिनी प्रीती शिंगवी आणि सौ.अश्विनी यांनी दिले. सदर कार्यक्रमानंतर बोलताना उपस्थित अनेक महिलांनी आमोदिनी फाउंडेशनचे कौतुक केले.तसेच आम्हाला मोलाचे मार्गदर्शन मिळाले आणि आम्हीही तुमच्या कार्यात सहभागी होऊ असे आश्वासन दिले.सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आमोदिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा एडवोकेट अनिशा फणसळकर,उपाध्यक्षा रश्मी जोशी,सचिव एडवोकेट संध्या बागुल,खजिनदार एडवोकेट नीलिमा चव्हाण तसेच टीम आमोदिनी माधवीताई,अश्विनीताई,चिरंजीवी ताई, चित्राताई,मोनाताई,मेघनाताई,प्रीतीताई,पल्लवी ताई,अनिताताई,कल्पनाताई,मृणाल ताई,यांनी मोलाचे सहकार्य केले.तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एडवोकेट अश्विनी कळंबकर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.आणि व्हीडीओ शुट महाराष्ट्र 24तासच्या मुख्य संपादक अमिता कदम यांनी केले.कार्यक्रमाची सांगता सुस्वाद अशा अल्पोपहाराने झाली. सदर अल्पोपहार आमोदिनी रश्मी जोशी यांनी दिला होता.पुर्ण कार्यक्रम अत्यंत दिमाखात पार पडला.

## महिलांना आर्थिक सक्षमीकरण करा आमदार चित्राताई वाघ,

### माजी नगरसेविका मनीषाताई लडकत यांच्या हळदी कुंकू समारंभ कार्यक्रमांमध्ये बोलत होते,

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**




भारतीय जनता पार्टी पुणे शहर प्रभाग क्रमांक 19 मध्ये मकरसंक्रांत निमित्त महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम समारंभ भवानी पेठ येथील माजी नगरसेविका मनीषा संदीप लडकत यांच्या जनसंपर्क कार्यालय जवळ घेण्यात आला होता, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाचे प्रदेश अध्यक्षा व विधान परिषदेचे आमदार चित्राताई वाघ हे उपस्थित होते, यावेळी चित्राताई वाघ म्हणाले हळदी कुंकवाचा कार्यक्रम प्रत्येक महिलेसाठी खास असतो हा कार्यक्रम खास होण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबवित असताना समाजात वावरताना महिलांना सुरक्षितता मिळावी व महिलांना आर्थिक सक्षमीकरण योजना राब व्यात असे मत चित्राताई वाघ यांनी व्यक्त केले, यावेळी महिलांना हळदीकुंकूचे वाण भेट देण्यात आले होते, या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेविका मनिषाताई संदीप लडकत यांनी केले, याप्रसंगी आमदार हेमंत रासने, मृणालिनी रासने, आमदार सुनील कांबळे, प्रीतीताई सुनील कांबळे, माजी नगरसेवक संदीप लडकत, त्याचबरोबर मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होते

# छोट्या व दुर्गम गावातील कुमारी ऋतिका खापरे जाणार



**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्हा परिषद यांनी राबविलेल्या "जाणू विज्ञान अनुभवू विज्ञान "या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना" नासा इस्त्रो" भेट हा नावीन्यपूर्ण उपक्रम गेल्या तीन वर्षापासून राबविण्यात येत आहे यावर्षी ही सन २०२४-२५ हा उपक्रम रत्नागिरी जिल्ह्यात राबविण्यात आला. वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन भविष्यात उत्तमोत्तम शास्त्रज्ञ घडावे, याच हेतूने सदर उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

या उपक्रमात मंडणगड तालुक्यातील दुर्गम व चहुबाजूनी डोंगराच्या कुशीत दडलेल्या निसर्गरम्य छोट्याशा शेडवई गावातील जिल्हा परिषद आदर्श शाळा शेडवई ,तालुका मंडणगड, जिल्हा रत्नागिरी या शाळेतील विद्यार्थिनी कुमारी ऋतिका लहू खापरे इयत्ता सातवी हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे आणि ती थेट बंगलोर येथील "इस्त्रो "व अमेरिकेतील "नासा" या दोन्ही संस्थांना भेट देण्यासाठी पात्र ठरली आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून तिने हे यश संपादन केले आहे. जिद्द ,चिकाटी आणि मनापासून केलेले प्रामाणिक प्रयत्न यामुळे आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न तीने सत्यात उतरवले आहे.

आपल्या शेडवई गावाचे, शाळेचे, आणि तालुक्याचे नाव ती सातासमुद्रापार अमेरिकेला घेऊन ती जाणार आहे. त्यामुळे चहुबाजूनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. जिल्हा परिषद आदर्श शाळा शेडवईने सलग तीन वर्ष या उपक्रमात यश मिळवल्याबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी माननीय श्री एन के शिंदे साहेब ,केंद्रप्रमुख श्री जगताप सर, केंद्रप्रमुख श्री खोपकर सर यांनी शाळेला भेट देऊन यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांचे मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी माननीय श्री एन के शिंदे साहेब यांनी तालुका स्तरावर केलेले शिबिराचे आयोजन व मार्गदर्शन मुख्याध्यापक श्री एकनाथ चांदे, पदवीधर शिक्षक, श्री जगदीश जालगावकर ,उपशिक्षिका श्रीमती विजया कामडी ,श्रीमती शामबाला शिंदे यांचे लाभलेले अचूक योग्य मार्गदर्शन आई-वडिलांचे सहकार्य यामुळेच हे यश मिळाल्याचे कुमारी ऋतिका खापरे आवर्जून सांगते. तसेच जिल्हा परिषद रत्नागिरीच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळेच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या ग्रामीण भागातील गोरगरीब कष्टकरी मुलांना नासा इस्त्रो सारख्या संस्थांना भेट देण्याची संधी उपलब्ध झाली .त्यामुळे जिल्हा परिषदेचेही ती मनापासून आभार मानते.

# महाराष्ट्र माझा न्युज चा द्वितीय वर्धापन दिन दिमाखात साजरा




युवक आधार निफाड
प्रतिनिधी राहुल कुलकर्णी

नाशिक- महाराष्ट्र माझा न्युज चैनल च्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त दिनांक 22 जानेवारी रोजी *महाराष्ट्र माझा गुणगौरव सोहळा 2025* चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र माझा न्युज चैनल चे मुख्य संपादक जनार्दन गायकवाड यांच्या संकल्पनेतून, आणि सर्व प्रतिनिधीं च्या सहकार्यातून आयोजित कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातून वेचक अशा , नाशिक शहर पोलीस प्रशासनातील उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी , नाशिक जिल्हा रुग्णालय येथील परिचारिका, स्वच्छता कर्मचारी, महानगरपालिका नाशिक येथील स्वच्छता कर्मचारी, कलाक्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील , नाशिक, पुणे, मुंबई, सापुतारा, कळवण, मालेगाव, मनमाड, येवला नांदगाव, केडगाव, दौंड, सोबतच गुजरात, राजस्थान या ठिकाणी सामाजिक क्षेत्रात सर्वसामान्य नागरिकांसाठी तळागाळात काम करणाऱ्या उत्कृष्ट समाजसेवकांसह, आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करणाऱ्या स्वाभिमानी पत्रकार बांधवांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने उपस्थित असलेला *इंडिया स्ट्रांगेस्ट मॅन* म्हणून किताब मिळवलेला, भारतभर वेट लिफ्टिंग मध्ये महाराष्ट्रासाठी तब्बल 25 गोल्ड मेडल विजेता *देव महेंद्र चव्हाण* प्रमुख आकर्षण ठरला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ पत्रकार शशिकांत पगारे यांनी भूषविले, तर व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त महेंद्र चव्हाण नंदुरबार शहर, नाशिक शहर महानगरपालिका उपायुक्त डॉ. मयूर पाटील , रिटायर पोलीस निरीक्षक नंदन बगाडे, ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत सोनवणे, कामगार नेते राजाभाऊ सौदे, संपादक जनार्दन गायकवाड सह कार्यकारी संपादक संजय मिश्रा यांनी पुरस्कर्त्यांना व्यासपीठावर सन्मानित केले. तळागाळातील कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांपर्यंत उपस्थित असणाऱ्या या आगळ्यावेगळ्या गुणगौरव सोहळ्यात समाजातील प्रत्येक घटकाने महाराष्ट्र माझा न्यूज च्या कार्याबद्दल संपादकांसह संपूर्ण टीमचे शब्द सुमनांनी भरभरून कौतुक केले.नाशिक ग्रामीण गुन्हे शोध पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश सुर्वे, गुंडाविरोधीपथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, नाशिक शहर गुन्हे शोध पथकाचे पवन परदेशी आणि सचिन करंजे, पत्रकार कुमार कडलक, पत्रकार देवानंद बिरारी, माहिती अधिकार कायदा जिल्हाध्यक्ष अनिल गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते देवा वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार, राजेंद्र जडे महाराष्ट्र भर शिवकन्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीमती संगीता ताई सोनवणे, यांनी आपली प्रमुख उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मर्दानी फाउंडेशनच्या सर्वेसर्वा श्रीमती ज्योतीताई गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन संजय मिश्रा यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी, संजय मिश्रा दौंड,स्वप्निल गायकवाड, विवेक बनकर, प्रणिता पाटील नाशिक, भागीरथ आतकरी इगतपुरी, भगवान खरे कळवण, विकास साळुंके केडगाव, शंकर गायकवाड सापुतारा, राजेश भडांगे विंचूर, राहुल कुलकर्णी निफाड, भगवान ढेरे बीड, उत्तम रौंदळ सटाणा, सह सर्व प्रतिनिधींनी योगदान दिले.

# भवताल थिएटर चिखली आयोजित

## मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धा उत्साहात संपन्न.




दैनिक युवक आधार
प्रतिनिधी- सारंग महाजन

रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगाव यांच्या पुज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेचे प्राथमिक फेरी चे आयोजन भवताल थिएटर चिखली येथे बाळासाहेब देवरस प्राथ.शाळा चिखली येथे केले असूनदि.१९ जाने रविवारी अभिवाचन स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेकरिता मान्यवर परिक्षक प्राचार्य श्री अनंत शिरसाट व जेष्ट चित्रपटकलावंत श्री गणेश देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

जीवनात कलेचे अनन्य साधारण महत्त्व व कलेचा व्यासंग या विषयी श्री अनंत शिरसाट यांनी उपस्थितांना कानमंत्र दिला.वाचन कौशल्य वृद्धिंगत करणारी हो अभिवाचन स्पर्धा आहे. अभिवाचन करतांना अभिप्रेत असणारी कौशल्या विषयी श्री गणेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

भवताल थिएटर , चिखली चे संचालक विनय शुक्ल यांनी भवताल थिएटर ची वाटचाल आणि उपक्रम यासंबंधी सविस्तर माहिती दिली. एकुणा १४ संघाने या स्पर्धेत विनोदी साहित्य आणि प्रवासवर्णन था विषयावर अभिवाचन सादर केले.

अक्षरदेह नाट्य कला केंद्र बुलढाणा तर्फे शशिकांत इंगळे व सांची इंगळे यांनी सादर केलेल्या पद्मपाणी या प्रवासवर्णन याअभिवाचनाला प्रथम कृमांक प्राप्त झाला. सरोज देशमुख व श्रीमती कुंदा महाजन यांच्या स्वलिखित "माझा आठवणीतील कोकण प्रवास" याला व्दितीय कृमांक प्राप्त झाला."चिउकाऊची गोष्ट" ही दिपा गोवारीकर यांची कथा गप्पांगन ग्रुप तर्फे कान्हाई कुळकर्णी व विभा पानगोळे यांनी सादर करून तृतिय कृमांक प्राप्त केला असून विजेत्या सहभागी स्पर्धकांना

उत्कृष्ट वाचिक अभिनयाबद्दल बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच वैदेही आसोलकर,शुभम सोरमारे,माधवी मुळे,अंजली कुलकर्णी,कविता लंके या सहभागी स्पर्धकांना उत्कृष्ट वचक अभिनयाबद्दल उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी भवताल थिएटर चे सभासद श्री सारंग महाजन , सौ सारीका शुक्ल, सौ गौरी ठोसर, श्री अनंत कुळकर्णी श्री सुधिर कुळकर्णी यांनी सहकार्य केले. श्री सुदर्शन जी भालेराव यांनी अभिवचन स्पर्धेकरिता बाळासाहेब देवरस प्राथमिक शाळेचा हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांना पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# फातिमा शेख यांचे काल्पनिक पात्र म्हणणाऱ्या दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा.:- सज्जाद सय्यद

दैनिक युवक आधार पाटोदा (प्रतिनिधी) - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षण देण्याचे काम त्यांचे सहकारी म्हणून शिक्षिका फातिमा शेख यांनी केले. तसेच उस्मान शेख यांनी ०१ मे-१८४९ रोजी पुणे येथे प्रौढ शिक्षणाची स्थापना केली होती. त्या मध्ये सुद्धा माता सावित्रीबाई फुले यांनी अध्यापन कार्य केले. सावित्रीबाई फुले यांच्या मैत्रिण व सहकारी शिक्षिका फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या अनुपस्थितीमध्ये शाळा सांभाळण्याचं काम केले. उस्मान शेख व महात्मा फुले यांचे विचाराची मैत्री होती. आणि उस्मान शेख यांची बहीण शिक्षिका फातिमा शेख मुस्लिम समाजातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. त्यांच्या अनेक ग्रंथात माता सावित्रीबाई फुले व माता फातिमा शेख व शाळेतील मुली सह अनेक दुर्मिळ फोटो आज ही उपलब्ध आहेत. अनेक ग्रंथात त्यांचा उल्लेख आहे. त्यांच्या या कार्यपद्धतीवर केंद्रीय माहिती प्रसारण सल्लागार दिलीप मंडल यांनी हे काल्पनिक पात्र आहे असे वक्तव्य केले आहे. त्या मुळे मुस्लिम, बहुजन समाजासह सत्यशोधक चळवळीला गालबोट लागत आहे. शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये हे विधान खपवून घेतले जाणार नाही. या वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध करून दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक सज्जाद सय्यद, मानवाधिकारचे शेख इम्रान नूर यांनी मा.उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्या कडे निवेदनद्वारे केली आहे.

# तळा ज्युनियर कॉलेज इ १२ वी च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद प्रदान समारंभ उत्साहत संपन्न

दैनिक युवक आधार तळा वार्ताहर
: तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा इयत्ता बारावी २०२४-२५ च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद प्रदान समारंभ २३ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, श्री विठ्ठल जोशी, संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, शिक्षक प्रतिनिधी प्रा द्यानेकर बी एन, संस्थेचे पदाधिकारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी जयश्री काप, श्रुती ठाकूर, सुहानी गायकवाड, ओमकार बटावळे, माधवी सावरटकर, दीक्षा जगताप, सुजल जाधव या बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा कुळकर्णी बी एस यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे यांनी सर्व विद्यार्थ्यांनी आपले उज्ज्वल भविष्य घडवून आई बाबा, शिक्षक व संस्थेने नाव रोशन करावे असे आवाहन करुन भावी वाटचालीसाठी आमचा कायम आशीर्वाद असल्याचे सांगितले. संस्थेचे सचिव श्री मंगेशशेठ देशमुख यांनी स्पर्धेच्या युगात चांगली प्रगती करण्यासाठी जिद्द, चिकाटी व मेहनत या तीन गोष्टींचा अवलंब करावा, असे आवाहन केले व संस्था राबवित असलेल्या सर्व उपक्रमास आपण प्रतिसाद द्यावा असे प्रतिपादन केले. संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे यांनी आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाचा सलग पाच वेळा बोर्डात प्रथम क्रमांकाचा निकाल लागला असून विध्यार्थ्यांना भविष्य घडवायचं असेल तर कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, असे प्रतिपादन केले. प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी यावर्षी बोर्ड परीक्षेत कोणता बदल झालेला आहे त्याची माहिती दिली.

# नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने महापालिका मुख्यालयात अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज ( 23 जानेवारी ) नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने



त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी आयुक्त मंगेश चितळे , शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरिष घरत, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, माजी नगरसेवक नितीन पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगर प्रमुख अवचित राऊत, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नवीन ग्रामपंचायत कार्यालयामुळे विकासाला चालना मिळणार:सरपंच निकिता समाधान घोपरकर

**दैनिक युवक आधार पनवेल/प्रतिनिधी:** नवीन ग्रामपंचायत कार्यालयामुळे परिसराच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे प्रतिपादन सरपंच निकिता समाधान घोपरकर यांनी केले.त्या दापोली ग्रामपंचायतीच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.याप्रसंगी गटविकास अधिकारी समीर वाठारकर,माजी सभापती प्रकाश जितेकर,समाधान घोपरकर,उपसरपंच विलास दमडे,सह गटविकास अधिकारी महेश पांढरे, विस्तार अधिकारी मिनल कनोजे, कार्यकारी अभियंता राहुल देवांग,उपअभियंता विनोद माहोरे,शाखा अभियंता परवीन काझमी,ग्रामपंचायत अधिकारी सचिन जगताप,पारगाव ग्रामपंचायत अधिकारी प्रतिभा वानखेडकर यांच्यासह सदस्या पुनम सचिन जितेकर, जयवंती कुंडलिक जितेकर, सदस्य संदिप राम गोसावी, मिथुन धनराज जितेकर, सदस्या निलम चंद्रशेखर पाटील, अनिता कृष्णा पाटील,सदस्य सदन राम डाउर, सदस्या ज्योती रघुनाथ कांबळे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यापुढे बोलताना सरपंच निकिता समाधान घोपरकर म्हणाल्या की, दापोली ग्रामपंचायत होवू घातलेल्या विमानतळाच्या नजीक असलेली ग्रामपंचायत आहे. त्यामुळे साजेसे कार्यालय असणे आवश्यक होते. त्यामुळे पाठपुरावा करून ग्रामनिधीतून 65 लाख रूपये खर्च करून सर्व सुविधांयुक्त ग्रामपंचायत कार्यालय उभारले आहे.या कार्यालयातून पारदर्शक कारभार करून सर्व सुविधांयुक्त कामे होणार असल्याचे त्या शेवटी म्हणाल्या. तर गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी नवीन ग्रामपंचायत कार्यालयास शुभेच्छा देताना ग्रामपंचायतीचा आर्थिक स्तर या कार्यालयामुळे उंचावणार असल्याचे सांगितले.

दापोली ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे उद्घाटन

# राष्ट्रवादी ( वैद्यकीय ) मदत कक्षाच्या प्रदेशाध्यक्ष जितेंद्र सातव यांचे कार्य कौतुकास्पद:उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक युवक आधार
पुणे विभागीय प्रतिनिधी सुनील कलशेट्टी

पुणे --राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (वैद्यकीय) मदत कक्षाच्या स्थापनेला एक वर्ष पूर्ण झाली. एका वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील संबंध जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मदत मिळवून देण्यास वैद्यकीय कक्ष यशस्वी ठरला आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेश अध्यक्षा तथा महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (वैद्यकीय) मदत कक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा. जितेंद्र सातव यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असून. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना १ वर्षापूर्वी करण्यात आली असून या एका वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील ग्राम स्तरापर्यंत अत्यंत गोर गरीब रुग्णांपर्यंत माहिती पोहचून आणि रुग्णांना मदत मिळवून देण्यास कक्ष यशस्वी ठरला आहे.नुकत्याच शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून या कक्षाच्या कामाचे कौतुक करण्यात आले. रुग्णांना मदती व्यतिरिक्त, कक्षाच्या माध्यमातून विविध स्तरावर आरोग्य, अवयव दान, रक्तदान शिबिरे राबवण्यात आल्याने याचा फायदा



आणि गरजू रुग्णाला झाला. हे अत्यंत आनंदाने नमूद करावेसे वाटते असे ही अजित पवार यांनी म्हटले. महाराष्ट्रातील गोरगरीब रुग्णांना राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख जितेंद्र सातव यांच्या माध्यमातून लाखो रुपयाची मदत मिळवून देण्यात आली. तसेच २०० हून अधिक पदाधिकाऱ्यांच्या तालुका, जिल्हास्तरावर नियुक्त्या करण्यात आल्या. १४०० पेक्षा जास्त सदस्य जोडण्याचे काम करण्यात आले. महात्मा फुले जन आरोग्य योजना, धर्मादाय, मुख्यमंत्री सहायता निधी, पंतप्रधान सहायता निधी, सिद्धिविनायक ट्रस्टच्या माध्यमातून दाखल रुग्णाचे बिल कमी करणे, अल्पदरात रुग्णसेवा, अत्यंत महाग औषध कमी दरात मिळून देणे, रुग्णवाहिका, मृत्यू दाखला मिळण्यासाठी सहकार्य करणे, अशा विविध योजनांची माहिती जनसामान्य पर्यंत पोहोचवणे यांसारखे असंख्य उपक्रम राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील नियुक्त पदाधिकाऱ्यांची कामे वाखाणण्याजोगे सरस ठरली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

( अ प वैद्यकीय मदत कक्ष) महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस सचिन सरवदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

# नैताळे येथील श्री मतोबा महाराज यात्रेनिमित्त भाकविकांची गर्दि

दै. युवक आधार विंचूर प्रतिनिधी जनार्दन चव्हाण नाशिक : छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नैताळे येथील ग्रामस्थांचे आराध्य दैवत श्री. मतोबा महाराज हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे दैवत असल्याने श्री.मतोबा महाराज यात्रेनिमित्त ग्रामस्थ उपस्थित होते



# नविन पनवेलच्या पिल्लई महाविदयालयावर पनवेल मनसेची धडक

**दैनिक युवक आधार**

नवीन पनवेल वार्ताहर : नवीन पनवेलच्या पिल्लई महाविदयालयावर मनसेचा आक्रमक मोर्चा पाहायला मिळाला. पिल्लई कॉलेज मध्ये दरवर्षी होणाऱ्या "अलेग्रिया" या कार्यक्रमासाठी मनसेने आक्षेप नोंदवला आहे. मनसे पनवेल शहराध्यक्ष योगेश चिले यांच्या सुचनेवरून मनसेचे अनेक कार्यकर्ते पिल्लई महाविद्यालयाच्या "अलेग्रिया" या वार्षिक महोत्सवास विरोध करण्यासाठी



महाविद्यालयावर धडकले. अश्लिलतेला प्रोत्साहन देणारा , महाराष्ट्रातील संस्कृतीचा अपमान करणारा आणि बिभत्सतेने भरलेला "अलेग्रिया" आम्ही होऊ देणार नाही अशी भुमिका मनसेने घेतलेली आहे. याबाबतचे सुचक पत्र मनसे शिष्टमंडळाने महाविदयालयाला दिले आहे. महोत्सव दरम्यान चालणारे सर्व कार्यक्रम हे तरुण पिढीला बरबाद करणारे असल्याचा आरोप मनसेने केला आहे. तसेच महाविद्यालयाचे काम हे विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देण्याचे त्यांच्या अभ्यासक्रमावर भर देण्याचे आहे. मात्र महाविद्यालयात जे कार्यक्रम होत आहे त्यामुळे जर तरुण पिढी बरबाद होणार असेल तर असे कार्यक्रम होऊ देणार नसल्याचे मनसेचे म्हणणे आहे. महाविद्यालयातील कार्यक्रमाचे स्वरूप बदलले नाही तर हा कार्यक्रम होऊ देणार नाही असे मनसेने आपल्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे पिल्लई कॉलेजचा "अलेग्रिया" महोत्सव यंदाच्या वर्षी रद्द होतो की काय अशी चर्चा रंगली आहे. याबाबत पिल्लई महाविद्यालय प्रशासनासोबत संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

# येवती यात्रेच्या कुस्ती फडात लातुरच्या लवटेने मारली बाजी

## शेवटची कुस्ती उदगीरच्या धिरजचा पराभव करित लातुरच्या तुषार लवटे जिंकली





**दैनिक युवक आधार नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेडच्या मुखेड तालुक्यातील येवती येथील सुप्रसिध्द श्री. सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या कुस्ती फडात शेवटची कुस्ती आठ हजार रुपयेची लातुरच्या तुषार लवटेने जिंकली असुन त्यांनी उदगीरच्या धिरजचा पराभव केला आहे. श्री सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त दरवर्षी यात्रा कमेटी व समस्त गावकरी मंडळ यांच्या वतीने कुस्त्यांचे आयोजन केले जाते. यंदा दि. २१ जानेवारी २०२५ रोजी जंगी कुस्त्यांचे भव्य आयोजन केले होते. या आखाड्यात यंदा कुस्ती खेळण्यासाठी मराठवाड्यातील प्रसिद्ध हिंद केसरी पैलवान दाखल झाले होते. तर दुसरीकडे कुस्ती प्रेमींनीही कुस्त्या पहाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. श्री सद्गुरू नराशाम महाराज यात्रेनिमित्त कुस्त्यांचे नियोजन गावातील पद्माकर पाटील येवतीकर, पंढरी पाटील गोपनर, रंजीत पाटील गोपनर, वसंतराव पाटील येवते, निळकंठराव सुभेदार, शिवाजी पिंपरे, हाणमंतराव पा सुडके, देविदास गुरुजी सुडके, बंडू पाटील सुडके, शिवाजी गुरुजी सुडके, संदीप पा सुडके, नरहरी नागरगोजे, शामराव नागरगोजे, संतोष सावकार, श्रीहरी पाटील नागरगोजे, पत्रकार विठ्ठल पाटील येवतीकर, राम शेट सुडके , डॉ.कोडिंबा सुडके, कार्यकर्ते ज्ञानोबा पुंडलिक घाटे, शेख मैनोदीन येवतीकर , लक्ष्मण पाटील गोपनर , अखिल येवतीकर आदी मान्यवरांकडून केले जाते. यंदा अतिशय चांगल्या प्रकारे कुस्त्या शांततेत पार पडले असून यावेळी. मुखेड पोलिस ठाण्याचे कर्तव्य दक्ष पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे साहेबांच्या आदेशाने बिट जमादार व्यंकट जाधव यांनी चोख असा बंदोबस्त ठेवला होता . तर दुसरीकडे गावकऱ्यांच्या वतीने पोलिस प्रशासनाचे आभार मानण्यात आला आहे.

# पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे गुटख्याचा मोठा साठा जप्त; अन्न व औषध प्रशासन व खांदेश्वर पोलीसांची कारवाई

**दैनिक युवक आधार पनवेल,(वार्ताहर)**

पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे गुटख्याचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. आज सकाळी जवळपास साडे सातच्या सुमारास विचूंबे परिसरात काही अवैध गोष्टी घडत असल्याची माहिती गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून मिळाली त्या अनुषंगाने पोलीस प्रशासन व अन्न नागरिक औषध प्रशासन यांच्या माध्यमातून या ठिकाणी धाड टाकण्यात आली त्या ठिकाणी तपास केला असता मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा आढळून आला. त्याची किंमत जवळपास 20 लाख असून याबरोबर एक दुचाकी सुद्धा हस्तगत करण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्रात गुटखा बंदी असल्याने असा साठा ठेवण्यास कायद्याच्या दृष्टीने मज्जाव आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन व खांदेश्वर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी, गुप्त वार्ता कोकण विभाग उत्तरेश्वर बडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पनवेल मधील विचुंबे गावात एका चाळीतल्या खोलीमध्ये आढळून आलेला 20 लाख 6 हजार किंमतीला गुटखा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुटखा पान मसाला अशा तंबाखू युक्त पदार्थ मिळून आतापर्यंत जवळपास 28 लाखांचा मुद्देमाल व माल पोचवण्यासाठी वापरण्यात आलेल्या दुचाकी देखील जप्त करण्यात आली आहे.



# प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पीजेबी नॅशनल पब्लिक स्कूलला आयपीएस अंकुश शिंदे यांची सदिच्छा भेट

दैनिक युवक आधार पनवेल (वार्ताहर): प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पळस्पे येथील पीजेबी नॅशनल पब्लिक स्कूलला आयपीएस अंकुश शिंदे यांनी शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी शाळेचे चेअरमन डॉ.जयंत भोईर यांनी शाळेच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. अंकुश शिंदे यांनी शाळेची पाहणी केली तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका राजेश्री जगदाळे आदींसह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# आई गावदेवी चषकाचे आंबिवली येथे आयोजन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल : वार्ताहर प्रकाश झोतातील मर्यादित षटकांचे ग्रामीण क्रिकेट सामन्यांचे आयोजन आई गावदेवी चषक, आंबिवली येथील सुरेश घनसोलकर मैदानावर 26 जानेवारीपर्यंत करण्यात आले आहे. यावेळी प्रथम पारितोषिक एक लाख रुपये आणि चषक, द्वितीय पारितोषिक 50 हजार रुपये आणि चषक, तृतीय पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, चौथे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, पाचवे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, सहावे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक आहे. यावेळी मॅन ऑफ द सिरीज मोटरसायकल, फलंदाज आणि गोलंदाजासाठी सायकल आणि क्षेत्ररक्षकासाठी कुलर भेट देण्यात येणार आहे. हे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी होत आहे. आंबिवली येथील रोहित पाटील आणि निलेश गाताडे यांनी या सामन्याचे आयोजन केले आहे.

# शिवाजी पार्कच्या धर्तीवर उलवा नोडमध्ये शिवसृष्टी उभारणार - लोकनेते रामशेठ ठाकूर

## नमो चषक स्पर्धेला लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत शानदार सुरुवात





दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर (लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी) शिवाजी पार्क व आझाद मैदान हे राज्याच्या दृष्टिकोनातून मुंबईतील अत्यंत महत्वाची अशी स्थान आहेत. या दोन्ही स्थळांना अनन्य साधारण महत्व आहे. असेच राज्यातील आणखी एक महत्वाचे स्थान पनवेल उरणसाठी उलवा नोडमध्ये व्हावे, यासाठी या ठिकाणी शिवाजी पार्कच्या धर्तीवर मैदान आणि शिवसृष्टी उभारणार असल्याची ग्वाही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. २३) उलवा नोड येथे 'नमो चषक २०२५' भव्य क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यावेळी केले.

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने दिनांक २३ ते २५ जानेवारीपर्यंत उलवा नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या पाठीमागील बाजूच्या मैदानावर अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत आयोजित करण्यात आलेल्या या नमो चषकचे ढोलताशा लेझीम, फटाक्यांची आतषबाजी आणि हजारो खेळाडू आणि क्रीडा रसिकांच्या साक्षीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या शानदार उद्घाटन हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या ठिकाणी असलेल्या अटल सेतूवरून जाणाऱ्या प्रत्येक माणसाला छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट दर्शन होईल, त्या अनुषंगाने महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख,



नमो चषकाचे मुख्य आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शहा, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, दीपक अहुजा, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, तालुका क्रीडा अधिकारी मानकर, तालुका गटशिक्षण अधिकारी सिताराम मोहिते, उरण गटशिक्षण अधिकारी प्रियंका पाटील, शिक्षण अभियंता अभिजित मटकर, खारघर अध्यक्ष प्रविण पाटील, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, अमरीश मोकल, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, जीवन गावंड, कामगार नेते सुरेश पाटील, सुधीर घरत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, तालुका अध्यक्षा कमला देशेकर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, ऍड. मनोज भुजबळ, विकास घरत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, नीता माळी, वर्षा नाईक, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, डॉ. संतोष आगलावे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, उलवे नोड अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे २ अध्यक्ष विजय घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक, दिनेश खानावकर, योगिता भगत, सुधीर ठाकूर, धीरज ओवळेकर, तेजस जाधव, वितेश म्हात्रे, गौरव नाईक, गौरव कांडपिळे, नितेश पाटील, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या नमो चषकाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव प्रत्येकाच्या मनाला आनंद देणारा आहे. हि स्पर्धा अतिशय मेहनत घेऊन होत आहे. २०१७-१८ सालापासून या मैदानावर आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य अश्वारूढ पुतळा उभारणी आणि विविध कार्यक्रमे, सभा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांसाठी मैदान व्हावे, यासाठी सतत पाठपुरावा आम्ही करत आलो आहोत. २६ जानेवारी २०२० रोजी गव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत मुंबईच्या शिवाजी पार्क सारखे एक मैदान उलवे नोड मध्ये तसेच माझ्या म्हणजेच रामशेठ ठाकूर यांच्या नावाने हे मैदान निर्माण व्हावे असा प्रस्ताव काँग्रेस नेते महेंद्र घरत यांनी मांडला आणि त्याला ग्रामस्थांनी अनुमोदन दिले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयासाठी व मैदानासाठी सिडकोने जमीन देण्याचे कबूल केले आहे. या जमीनीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारुढ पुतळा उभारण्यासाठी जो काही खर्च येईल तो मी करायला सहमती दिली आहे. आणि या सर्व कामासाठी २५ ते ३० कोटी रुपये खर्च करण्याची तयारीही मी दर्शवली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नजीक उलवे नोड हा भाग सिडको विकसित करत आहे. अटल सेतूमुळे मुंबईच्या अगदी नजीक आली आहे. या भागात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याची संकल्पना गव्हाण आणि उलवे विभागातील नागरिकांनी मांडली आहे. या स्मारकासाठी सिडकोकडे जमीन मागितली होती. ती जमीन सिडको देण्यास तयार झाली आहे. अश्वारूढ पुतळयासाठी साधारण एक एकर जमीन सिडकोने राखीव ठेवली आहे तर मैदानासाठी ५ एकरचा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. शेतकऱ्यांकडून १५ हजार रुपये एकरी या भावाने सिडकोने त्यावेळी जमीन खरेदी केली आहे. मात्र आता त्याच एकरसाठी जवळपास ५ कोटींच्यावर रक्कम भरण्यास सिडकोकडून सांगण्यात येत आहे.सामाजिक कार्यासाठी संस्था संघटनांना नाममात्र शुल्कात भूखंड सिडकोकडून दिले जाते. त्याच धर्तीवर ही जमीन सामाजिक कार्यासाठी नाममात्र दरात मिळावी. खरेतर प्रकल्पग्रस्त उभारत असलेल्या प्रकल्पाला सिडकोने जमीन मोफत द्यायला हवी. या बाबतीत आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. भूमिपुत्रांकडून उभारण्यात येणाऱ्या या शिवसृष्टीला ते सहकार्य करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करत या ठिकाणी शिवाजी पार्क प्रमाणे आणि महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि त्या अनुषंगाने शिवसृष्टी तसेच मुलांना खेळण्यासाठी प्ले गार्डन, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरुंगुळा केंद्र, संमेलने, क्रीडा स्पर्धा, राजकीय सभा, सांस्कृतिक महोत्सव व अन्य कार्यक्रमांसाठी उभारण्यात येणारे हे भव्य मैदान नागरिकांना खूप फायदेशीर ठरणार आहे. यासाठी मी खर्च करणार असलो तरी यावर सर्वांचा हक्क राहील आणि या सर्व वास्तूंचा ताबा अधिकार गव्हाण ग्रामपंचायतीकडे राहील, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी अधोरेखित केले.

**लोकनेते रामशेठ ठाकूर हे मनाने मोठे असलेले नेते आहेत. त्यांच्या रूपाने व्हिजन असलेला नेता आपल्या सर्वांना मिळाला आहे. लोकांसाठी काम करणारा आत्मा त्यांच्याकडे आहे. या ठिकाणी सुंदर क्रीडानगरी या स्पर्धेच्या निमिताने निर्माण झाली आहे. अटल करंडक, नमो चषक, उत्सव तसेच इतर पंतप्रधानांच्या सन्मानार्थ कार्यक्रमे सातत्याने आयोजित करून स्फूर्ती निर्माण करत असतात. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांच्याकडून या बाबी शिकण्यासारख्या आहेत. मी अनेक कार्यक्रमांना गेलो आहे पण भव्य दिव्य आयोजन काय असते ते या महोत्सवातून दिसत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून खेळ आणि खेळाडूंची विशेष काळजी घेण्यात आली आहे. दोनवेळा नाश्ता आणि दोन्हीवेळा जेवण देण्याबरोबरच इतर सुविधाही खेळाडूंना या ठिकाणी उपलब्ध करून दिल्या आहेत आणि हे खेळाडूंच्या दृष्टिकोनातून महत्वाचे असे आहे. अटल सेतूवरून येता-जाताना शिवसृष्टीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन होणार आहे. ज्या ठिकाणी रामशेठ ठाकूर त्या ठिकाणी यश आणि त्यामुळे त्यांच्या शब्दावर लाखो मते आहेत.**

**- बाळासाहबे पाटील, माजी सभापती-कोकण म्हाडा**

**या क्रीडा महोत्सवात राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, खो-खो, कबड्डी तसेच धावणे, भाला फेक, थाळी फेक, गोळा फेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडा फेक या अ‍ॅथलेटीक्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत सात हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग नोंदीत झाला आहे. राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ०७ लाख ५६ हजार रुपये, खो-खो मधील एकूण विजेत्यांना ०१ लाख ४३२०० रुपये, कबड्डी स्पर्धेतील मधील एकूण विजेत्यांना ०१ लाख ८१ हजार रुपये तर अ‍ॅथलेटीक्स स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ०४ लाख ११ हजार रुपये अशी एकूण तब्बल १४ लाख ९१ हजार २०० रुपयांची रक्कम आणि चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विजेत्या खेळाडूंना भरघोस रक्कमेची बक्षिसे आणि विनामूल्य प्रवेश या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्टय आहे.**